# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. २१
# सभा क्र.३६, दिनांक ०६/०९/२०२३ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची तहकूब सभा (शुक्रवार, दि. २५/०८/२०२३ रोजीची) बुधवार, दि. ०६/०९/२०२३ दुपारी ३.५५ (तीन वाजून पंचावन्न मिनिटे) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**वृत्तांत कायम करणे**

मा. स्थायी समिती सभा क्र. ३३, दि. २५/०८/२०२३, सभा क्र. ३४, दि. ०१/०९/२०२३ व सभा क्र. ३५, दि.०१/०९/२०२३ असे एकूण तीन वृत्तांत कायम करण्यात आले.

**कार्यपत्रिकेवरील विषय**

**उपआयुक्त विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र.४८०**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे दि. ०१/०७/२०२३ ते दि. ३१/०७/२०२३ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबतमा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/५१९८, दि. २३/०८/२०२३चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र.४८१**

दि. ०७/८/२०२३ ते दि. १३/८/२०२३ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १५ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/४४४, दि. २३/८/२०२३ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.४८२**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि. ०१ ऑगस्ट२०२३ ते दि. १५ आगॅस्ट २०२३ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/४४५, दि. २३/०८/२०२३चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**सेवक वर्गाची प्रकरणे**

**विषय क्र.४८३**

श्रीमती चंद्रभागा लाला म्हस्के, हुद्दा – बिगारी,हडपसर – मुंढवा क्षेत्रीय कार्यालय यांचे निलंबनाची पहिली सहामाही दि. ०७/१०/२०२० ते दि. ०६/०४/२०२१ दुसरी सहामाही दि. ०७/०४/२०२१ ते दि. ६/१०/२०२१, तिसरी सहामाही दि. ०७/१०/२०२१ ते दि.०६/०४/२०२२, चौथी सहामाही दि.०७/०४/२०२२ ते दि. ०६/१०/२०२२, पाचवी सहामाही दि. ७/१०/२०२२ ते दि. ०६/०४/२०२३ रोजी पूर्ण झालेली असून सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/४४१, दि. २१/८/२०२३चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र.४८४**

शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत जी–२० आंतरराष्ट्रीय परिषद सदस्यांचे पाहणी मार्गावरील स्वच्छतेसाठी कंत्राटी साफसफाई सेवक पुरविणे व तदनुषंगिक कामे करणे (सन २०२३–२४ ) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २टेंडर्सपैकी ठेकेदार मे. यु.आर.फॅसिलिटी सर्व्हिसेसयांचे टेंडर दोघात कमी रकमेचे ( टेंडर र.रु.४९,९९,९९४=८८ पेक्षा ०.००१% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रू. ५०,००,०४४=८८ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ अदा करणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस तसेच निविदा उघडल्याचे दिनांकापासून काम करून घेणेस व त्यादिवसा पासून बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/४३९,दि. २१/८/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ४८५**

बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयांचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहिनी/मलःनिस्सारण वाहिनी/गॅस वाहिनी / वीज वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिइन्सटेटमेंट करणे तसेच इतर तद्. कामे करणे भाग–२ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी

ठेकेदार मे.SHRI VITTHAL ENTERPRISES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. ६७,३१,६८५/– पेक्षा १७.९९% कमी) असल्याने त्यांचेकडूनर.रु. ५५,२०,६५४=८७ अधिक जी.एस.टी. र. रू. ९,९३,७१८/– पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ४३,२३६/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. १३,००५/– पर्यंत अशी एकूण र.रू. ६५,७०,६१३=८७ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/४४०,दि. २१/८/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ४८६**

जंगली महाराज रस्ता, शिवाजीनगर येथे विविध ठिकाणी पावसाळी लाईन विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. NIKHIL CONSTRUCTION GROUP PRIVATE LIMITED यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु.४,३६,४५,५५२/– पेक्षा ११.११% कमी ) असल्याने त्यांचेकडूनर.रु. ३,८७,९६,५३१=१७ अधिक जी.एस.टी. र. रू. ६९,८३,३७५/– पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. १८,३९,२१६=२ पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू. २,४५,४६५/– पर्यंत अशी एकूण र.रू. ४,७८,६४,५८७=३८ पर्यंत विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस वयांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/मलःनिस्सारण/४४६,दि. २३/८/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ४८७**

टेंडर क्र. ३-रिकॉल-२०२३, कामाचे नावः- विविध थोर व्यक्तींच्या जयंती वपुण्यतिथी, १५ ऑगस्ट व २६ जानेवारी निमित्त होणारे सत्कार समारंभ, पुरस्कार वितरण, मानपत्र देवून खास सत्कार तसेच पुणे महानगरपालिकेस भेट देणाऱ्या विविध शहरातील,राज्यातील तसेच परदेशी पाहुण्यांच्या स्वागतसमारंभ प्रसंगी स्मृतिचिन्हे व मानपत्र पुरविणे कामी ऑनलाईन निविदामागविल्या असता आलेल्या२ निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारकमे. वेदपाठक क्रिएशन्स, शॉप नं. ३, ३२२/३२३, महानर्मदा अपार्टमेंट, मोदी गणपती मंदीर मागे, नारायण पेठ , पुणे ४११००५ यांचेकडून काम करून घेणेस व त्याप्रित्यर्थ संबंधितांची बिले अदा करणेसप्रत्यक्ष वर्क ऑर्डर दिनांकापासून तेदि. ३१/०३/२०२४ या मुदतीत नगरसचिव कार्यालयामार्फत आयोजित विविध कार्यक्रमप्रसंगी स्मृतिचिन्हे व मानपत्र पुरविणेसाठीखालील दिलेल्या अटींच्या अधीन राहूनकाम करुन घेण्यास व त्यांची त्याप्रित्यर्थची बिले अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. प्र. नगरसचिव यांचे जा.क्र. ५५४, दि. २४/८/२०२३ चे पत्र.

१. मे. वेदपाठक क्रिएशन्स, शॉप नं. ३, ३२२/३२३, महानर्मदा अपार्टमेंट, मोदी गणपती मंदीर मागे, नारायण पेठ , पुणे ४११००५ यांचेकडून प्रत्यक्ष वर्क ऑर्डर दिनांकापासून ते दि.३१/०३/२०२४ या मुदतीत एकूण रक्कम रूपये १२,००,०००/- (अक्षरी रूपये बारा लाख फक्त )रकमेपर्यंत मा.प्र.नगरसचिव यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या दरानुसार स्मृतिचिन्हे व मानपत्र पुरविणे या कामाचा ठेका देण्यास व त्याबाबत त्यांचेशी करार करण्यास,
२. मा.प्र.नगरसचिव यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या दरानुसार काम करून घेण्यास व त्याप्रमाणे त्यांची बिले अदा करण्यास,
३. काही कारणामुळे मे. वेदपाठक क्रिएशन्स, हे उपलब्ध नसल्यास मे. साईराज बीआरसीपी ग्लोबल एलएलपी यांचेकडून मे. वेदपाठक क्रिएशन्स यांनी दिलेल्या मा.प्र.नगरसचिव यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या दरानेकाम करून घेण्यासव त्यांची त्या प्रित्यर्थची बिले अदा करण्यास,
४. सदरील खर्च नगरसचिव कार्यालयाकडील lmbrb संबंधित बजेट हेड वर खर्ची टाकण्यास,

**सन २०२३–२४**

१. बजेट कोड–RE11A274/R1
   र.रु. ३१,६०,०००/– (अक्षरी रक्कम रुपये एकतीस लाख साठ हजार फक्त)
२. बजेट कोड–RE11A123A
   र.रु. ३,००,०००/–(अक्षरी रक्कम रुपये तीन लाख फक्त)
३. बजेट कोड–RE11A276/ R3
   र.रु. १,५९,३५,०००/–(अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एकोणसाठ लाख पस्तीस हजार फक्त)

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ४८८**

टेंडर क्र. १-२०२३, कामाचे नावः- राष्ट्रीय थोर व्यक्तींच्या जयंती व पुण्यतिथी, १५ ऑगस्ट व २६ जानेवारी निमित्त होणारे सत्कार समारंभ, पुरस्कार वितरण,मानपत्र देवून खास सत्कार तसेच पुणे महानगरपालिकेस भेट देणाऱ्या विविधशहरातील,राज्यातील तसेच परदेशी पाहुण्यांच्यस्वागतसमारंभ प्रसंगी पुष्पहार, पुष्पगुच्छ, फुलांच्या माळा आणि तोरण पुरविणेकामी ऑनलाईन पद्धतीने व वर्तमानपत्रामधून निविदा मागविल्या असता आलेल्या २ निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारकमे. वेल्फेअर प्रोडक्शन, मंदार हेरिटेज, एफ न. ३०३, लेन न. , शिव शंभो नगर, कोंढवा बुद्रुक, हवेली, पुणे४११०४८यांचेकडूनकाम करून घेणेस व त्याप्रित्यर्थ संबंधिताची बिले अदा करणेसप्रत्यक्ष वर्क ऑर्डर दिनांकापासून ते ३१/०३/२०२४ या मुदतीत नगरसचिव कार्यालयामार्फत आयोजित विविध कार्यक्रमप्रसंगी पुष्पहार, पुष्पगुच्छ, फुलांच्या माळा आणि तोरण पुरविणेसाठlखालील दिलेल्या अटींच्या अधीन राहूनकाम करुन घेण्यास व त्यांची त्याप्रित्यर्थची बिले अदा करण्यासमान्यतामिळणेबाबत मा. प्र. नगरसचिव यांचे जा.क्र. ५५५, दि. २४/८/२०२३ चे पत्र.

१. मे. वेल्फेअर प्रोडक्शन, मंदार हेरिटेज, एफ न. ३०३, लेन न. , शिव शंभो नगर, कोंढवा बुद्रुक, हवेली, पुणे४११०४८७ यांचेकडून प्रत्यक्ष वर्क ऑर्डर दिनांकापासून ते ३१/०३/२०२४ या मुदतीत एकूण रक्कम रूपये १२,००,०००/- (अक्षरी रूपये बारा लाख फक्त )रकमेपर्यंतमा.प्र.नगरसचिव यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या दरानुसार पुष्पहार, पुष्पगुच्छ, फुलांच्या माळा आणि तोरण पुरविणे या कामाचा ठेका देण्यास व त्याबाबत त्यांचेशी करार करण्यास,

२. मा.प्र.नगरसचिव यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या दरानुसार काम करून घेण्यास व त्याप्रमाणे त्यांची बिले अदा करण्यास,

३. काही कारणामुळे मे. वेल्फेअर प्रोडक्शन हे उपलब्ध नसल्यास मे. वेल्फेअर प्रोडक्शन यांचेकडून मान्य करण्यात आलेल्या दरानेअन्य व्यावसायिकांकडून काम करून घेण्यासव मा.प्र.नगरसचिव यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या त्याप्रित्यर्थची बिले अदा करण्यास,

४. सदरील खर्च नगरसचिव कार्यालयाकडील खालील संबंधित बजेट हेड वर खर्ची टाकण्यास,

**सन २०२३–२४**

१. बजेट कोड–RE11A274/R1
र.रु. ३१,६०,०००/– (अक्षरी रक्कम रुपये एकतीस लाख साठ हजार फक्त)

२. बजेट कोड–RE11A123A
र.रु. ३,००,०००/–(अक्षरी रक्कम रुपये तीन लाख फक्त)

३. बजेट कोड–RE11A276/ R3
र.रु. १,५९,३५,०००/–(अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एकोणसाठ लाख पस्तीस हजार फक्त)

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ४८९**

टेंडर क्र. २-२०२३, कामाचे नावः- राष्ट्रीय थोर व्यक्तींच्या जयंती व पुण्यतिथी, १५ ऑगस्ट व २६ जानेवारी निमित्त होणारे सत्कार समारंभ, पुरस्कार वितरण, मानपत्र देवूनखास सत्कारतसेच पुणे महानगरपालिकेस भेट देणाऱ्या विविध शहरातील,राज्यातील तसेच परदेशी पाहुण्यांच्या स्वागतसमारंभ प्रसंगी छायाचित्रे काढणे व व्हिडीओ शुटींग करणे कामी ऑनलाईन पद्धतीने व वर्तमानपत्रामधून निविदा मागविल्या असता आलेल्या २ निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे. वेल्फेअर प्रोडक्शन, मंदार हेरिटेज, एफ न. ३०३, लेन न. , शिव शंभो नगर, कोंढवा बुद्रुक, हवेली, पुणे४११०४८आणि मे. टाईम्स व्हिजन,बी-९६/११, इंदिरा नगर अप्पर, बिबवेवाडी, पुणे ३७ यांचेकडूनकाम करून घेणेस व त्याप्रित्यर्थ संबंधितांची बिले अदा करणेसप्रत्यक्ष वर्क ऑर्डर दिनांकापासून ते दि.३१/०३/२०२४ या मुदतीत नगरसचिव कार्यालयामार्फत आयोजित विविध कार्यक्रम, समारंभ प्रसंगी फोटो काढणे आणि व्हिडीओ शुटींग करणे साठी खालील दिलेल्या अटींच्या अधीन राहूनविभागूनकाम करुन घेण्यास व त्यांची त्याप्रित्यर्थची बिले अदा करण्यासमान्यतामिळणेबाबत मा. प्र.नगरसचिव यांचे जा.क्र. ५५६, दि. २४/८/२०२३ चे पत्र.

१) मे. वेल्फेअर प्रोडक्शन, मंदार हेरिटेज, एफ न. ३०३, लेन न. , शिव शंभो नगर, कोंढवा बुद्रुक, हवेली, पुणे४११०४८आणि मे. टाईम्स व्हिजन,बी-९६/११, इंदिरा नगर अप्पर, बिबवेवाडी,पुणे ३७ यांचेकडून प्रत्यक्ष वर्क ऑर्डर दिनांकापासून ते दि.३१/०३/२०२४ या मुदतीत एकूण रक्कम रूपये १२,००,०००/- (अक्षरी रूपये बारा लाख फक्त )रकमेपर्यंतमा.प्र.नगरसचिव यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या दरानुसार फोटो काढणे आणि व्हिडीओ शुटींग करणे या कामाचा ठेका देण्यास व त्याबाबत त्यांचेशी करार करण्यास,

२) मा.प्र.नगरसचिव यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या दरानुसार काम करून घेण्यास व त्याप्रमाणे त्यांची बिले अदा करण्यास,

३) काही कारणामुळे मे. वेल्फेअर प्रोडक्शन हे उपलब्ध नसल्यास क्र १,२ व ४ करिता मे. वेल्फेअर प्रोडक्शन यांचेकडून मान्य करण्यात आलेल्या दरानेमे. टाईम्स व्हिजन यांचेकडून काम करून घेणेस आणिमे. टाईम्स व्हिजनहे उपलब्ध नसल्यासक्र ३ व ५ करितामे.टाईम्स व्हिजनयांचेकडूनमान्य करण्यात आलेल्या दरानेमे. वेल्फेअर प्रोडक्शन यांचेकडून काम करून घेणेस तसेचदोन्हीही ठेकेदार उपलब्ध नसल्यास त्यांनी दिलेल्या मा.प्र.नगरसचिव यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या दरानुसार अन्य व्यावसायिकांकडून काम करून घेण्यासव त्यांची त्याप्रित्यर्थची बिले अदा करण्यास,

४) सदरील खर्च नगरसचिव कार्यालयाकडील खालील संबंधित बजेट हेड वर खर्ची टाकण्यास,

सन २०२३–२४

१. बजेट कोड– RE11A274/R1
र.रु. ३१,६०,०००/– (अक्षरी रक्कम रुपये एकतीस लाख साठ हजार फक्त)

२. बजेट कोड– RE11A123A
र.रु. ३,००,०००/–(अक्षरी रक्कम रुपये तीन लाख फक्त)

३. बजेट कोड– RE11A276/ R3
र.रु. १,५९,३५,०००/–(अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एकोणसाठ लाख पस्तीस हजार फक्त)

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र.४९०**

मनपा प्राथमिक शाळा क्रमांक ९४ मुलांची कै. मामासाहेब मोहोळ प्राथमिक शाळा, कोथरूड शाळेत अभिनव शाळा (FUTURISTIC SCHOOL) अंतर्गत ३० विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक सॉफ्टवेअर व हॉडवेयर असलेले डेस्क लॅन सिस्टिमसह तसेच

प्रोग्रॅम लायसन्स फी व संपूर्ण ई सिलॅबस तसेच मुख्य पोडियम आवश्यक सुविधांसह पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. एज्युफ्युचर टेक सोल्युशन्स यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. ५०,००,०००/– पेक्षा ०.३९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४९,९८,०४५=७६ निविदा दर १८ टक्के जीएसटी व इतर करांसहित टेंडर अटी व शर्तीनुसार व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/प्रशासकीय अधिशि/३४४,दि. २१/७/२०२३ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार८ दिवसांनी करावा असे दि. १८/८/२०२३च्या सभेत ठरले होते.)

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

**<u>संकीर्ण</u>**

**विषय क्र. ४९१**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या अंतर्गत ''मेरी माटी मेरा देश'' सोहळा समारोप दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजनाचे ब्रॅन्डींग करणेसाठी रक्कम रूपये – १,९९,६०४=७४ ( सर्व करांसह ) पर्यंत मे. फॉक्सबेरी टेकनॉलॉजी यांचे कलम ६७ (३) (क) अंतर्गत काम करून घेणेसाठी खालील बाबींस मा.स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/सांस्कृतिक/४३८,दि. १८/८/२०२३ चे पत्र.

१) स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव या अंतर्गत ''मेरी माटी मेरा देश '' सोहळा समारोप दरम्यान पंच प्राण प्रतिज्ञेचा कार्यक्रम आयोजित करणे, वीरो का वंदन कार्यक्रम आयोजित करणे, स्थानिक पंरपरेनुसार शहिदांच्या कुटुंबाचा सन्मान करणे या कार्यक्रमाच्या आयोजनाचे ब्रॅन्डींग करणेसाठी मे. फॉक्सबेरी टेकनॉलॉजी या संस्थेकडून मा.अति.महा. आयुक्त (वि) यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या अ तक्त्यात नमूद केलेली कामे करून घेणेस.

२) मे. फॉक्सबेरी टेकनॉलॉजी यांना कार्यक्रमांचे ब्रॅन्डींग करण्याचेबिल रक्कम रूपये – १,९९,६०४=७४ ( सर्व करांसह ) करारनामा न करता त्यांना बिल अदा करणेस.

३) सदरचे बिल २–संकीर्ण RE28A102 या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**सही /–** xxx
**(योगिता भोसले)**
**प्र. नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**.

**वृत्तांत मंजूर.**

**सही /–** xxx
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**